# अंध, अपंग, ज्येष्ठ यांच्यासाठी मेट्रो ३ मध्ये विशेष सुविधा

**मुंबई :** मुंबईतील पहिली भुयारी मेट्रो असणाऱ्या मेट्रो ३मध्ये अपंगांसाठी विशेष सुविधा पुरवण्यात आल्या आहेत. व्हीलचेअर ठेवण्यासाठी स्वतंत्र जागा देतानाच अंशत: अंध असणाऱ्यांचाही विचार मेट्रोची रंगसंगती ठरवताना करण्यात आला आहे. अंध प्रवाशांना हाताने ओळखता येतील असे स्टेनलीस स्टीलचे खांब आणि रेलिंग लावण्यात आल्या आहेत. अंशत: अंध आणि रंगांधळेपणा असणाऱ्यांचा प्रवास सोयीचा व्हावा यासाठी गडद रंगांचे हॅण्डल्स लावण्यात आले आहेत. व्हीलचेअर ठेवण्यासाठी स्वतंत्र जागा मेट्रोमध्ये असेल. तसेच अपंग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी काही जागा राखीव असतील. यामुळे सर्व नागरिकांना प्रवासाची समान संधी उपलब्ध होईल व मेट्रो ३चा प्रवास अधिक सुकर होणार आहे.